**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - संभाजी नारायण गावडे
वय - ४० वर्षे
व्यवसाय - पोहेकॉ ३७७
रा/ने - आचरा पोलीस ठाणे

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. १७/०५/२०२५ रोजी माझी नेमणूक आचरा पोलीस स्टेशन येथे पोहेकॉ म्हणून होती. माझी सदर दिवशी पेट्रोलिंग करीता नेमणूक करण्यात आली होती. सदर दिवशी पेट्रोलिंग करत असताना आम्हाला बातमी मिळाली की, आचरा तिठ्ठा येथे तेजस हार्डवेअरच्या समोर मुंबई पाणीपुरी सेंटरच्या शेजारील टपारीच्या मागील बाजूस एक इसम कल्याण मटका जुगाराचे लोकांकडून पैसे स्वीकारुन आकडेमोड करत आहे. आमच्या सोबत असलेले पोलीस हवालदार परब यांना बातमी मिळाली. हवालदार परब यांनी दोन पंच जगन्नाथ जोशी व सुशिल खरात यांना बोलावून घेतले. पंचाना हवालदार परब यांनी छाप्याची माहिती दिली. त्यांनी पंच म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली. आम्ही बातमीच्या ठिकाणी पोहोचलो असता त्या ठिकाणी एक इसम आकडेमोड करत असताना दिसून आला. त्या इसमाचा संशय आल्याने आम्ही त्या इसमाला जागीच थांबविले. सदर इसमाची अंगझडती केली असता त्याच्या ताब्यातून कल्याण मटक्याचे आकडेमोड केलेली त्यावर रक्कमा लिहिलेले पांढरे पुस्तक मिळून आले. सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आमचे नाव प्रशांत प्रभाकर नाईक रा. भंडारवाडी असे सांगितले. त्यांच्या ताब्यातून ०० किंमतीचे पांढरे पुस्तक, कार्बन, निळया शाईचा एक पेन, रक्कम रुपये ८८०/- मिळून आले. सदर मिळून आलेला मुद्देमाल हवालदार परब यांनी पंचासमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतला. त्यानंतर मी पोलीस स्टेशन येथे येवून आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. मी महाराष्ट्र जुगार अधिनियम १२-अ प्रमाणे दि. १७/०५/२०२५ रोजी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दिलेली आहे. साक्षीदारास दि. १७/०५/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१** दिली आहे. तसेच छापील

एफआयआर ला नि.क्र.पी२/पीडब्ल्यू१ दिले आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती टी.पी.चिंदरकर-कुबल यांचेमार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनमध्ये डयुटी रजिष्टर ठेवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय कामासाठी पोलीस स्टेशनच्या बाहेर जाताना डयुटी रजिष्टरमध्ये नोंद करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये ज्या खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत होतो त्या खाजगीवाहनाचा क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, खाजगी वाहनाचा नंबर फिर्यादमध्ये नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती.

३. हे म्हणणे खरे आहे की,कथीत घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकांची रहदारी व लोकांची हॉटेल व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील पंच हे आचरा गावचे पोलीस पाटील आहेत. बोगस ग्राहक पाठवून आम्ही मिळालेल्या बातमीची खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये सांगितल्याप्रमाणे आरोपी जी आकडेमोड करत होता त्याचा तपशिल फिर्यादमध्ये नमूद नाही तसेच तो आजरोजी सांगू शकत नाही. आरोपीचे नावाची खात्री करण्यासाठी त्याचे ओळखपत्र पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, जुगार मटका हा दोन व्यक्तीमध्ये खेळला जातो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये आरोपीने कोणाकडून किती पैसे घेतले व कोणी किती पैसे लावले हे माझ्या फिर्यादमध्ये नमूद नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, जुगार कायदयाअंतर्गत काहीतरी कारवाई करावी म्हणून आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १७/०५/२०२५ रोजी पेट्रोलिंग करत असताना आम्हाला बातमी मिळाली की, आचरा तिठ्ठा येथे तेजस हार्डवेअरच्या समोर मुंबई पाणीपुरी सेंटरच्या शेजारील टपारीच्या मागील बाजूस एक इसम कल्याण मटका जुगाराचे लोकांकडून पैसे स्वीकारुन आकडेमोड करत आहे, आमच्या सोबत असलेले पोलीस हवालदार परब यांना बातमी मिळाली, हवालदार परब यांनी दोन पंच जगन्नाथ जोशी व सुशिल खरात यांना बोलावून घेतले, पंचाना हवालदार परब यांनी छाप्याची माहिती

दिली. त्यांनी पंच म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बातमीच्या ठिकाणी पोहोचलो असता त्या ठिकाणी एक इसम आकडेमोड करत असताना दिसून आला, त्या इसमाचा संशय आल्याने आम्ही त्या इसमाला जागीच थांबविले, सदर इसमाची अंगझडती केली असता त्याच्या ताब्यातून कल्याण मटक्याचे आकडेमोड केलेली त्यावर रक्कमा लिहिलेले पांढरे पुस्तक मिळून आले, सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आमचे नाव प्रशांत प्रभाकर नाईक रा. भंडारवाडी असे सांगितले, त्यांच्या ताब्यातून ०० किंमतीचे पांढरे पुस्तक, कार्बन, निळया शाईचा एक पेन, रक्कम रुपये ८८०/- मिळून आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळून आलेला मुद्देमाल हवालदार परब यांनी पंचासमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतला, त्यानंतर मी पोलीस स्टेशन येथे येवून आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली, मी महाराष्ट्र जुगार अधिनियम १२-अ प्रमाणे दि. १७/०५/२०२५ रोजी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दिलेली आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त् केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.